Studies in Indian Place Names (UGC Care Journal)
ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

# अध्यापनात व्याकरण व परिभाषा नवे संदर्भ

**प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड**
मराठी विभागप्रमुख
सुंदरराव सोळंके महाविद्यालय,माजलगाव

**पार्श्वभूमी** :

१९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर राज्यभाषा म्हणून इंग्रजी ऐवजी मराठीचा वापर करण्याचे शासनाने ठरविले. साहजिकच मराठी सर्वव्यापक असावी, व्हावी हाही उददेश होता. परिणामी या मराठी भाषिक राज्यात प्रशासकीय, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा सर्रास वापर होऊ लागला. त्यातूनच मराठी सर्वसमावेशक, सामाजाभिमुख होऊ लागली, तसे तिच्या लेखन पध्दतीचे स्वरुप बदलणे जरुरीचे आणि सुगम आणि सोपे कसे करता येईल याचाही विचार व्हायला लागला.

१९२९ साली बेळगावच्या साहित्य संमेलनात प्रा.कृ.पा.कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली शुध्दलेखनाच्या विषयावर एक समिती नेमली. या समितीच्या नियमावलींना १९३० मध्ये मडगावच्या साहित्य संमेलनात मान्यता मिळाली. नागपूर विद्यापीठाने १९३२ मध्ये ही नियमावली स्वीकारली. नंतर १९५२ नंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेतर्फे सुधारित नियमावली तयार करण्यात आली. तिला शासन व एस.एस.सी. बोर्डाने मंजुरी दिली. १९५३ साली विदर्भ साहित्य संघाने तज्ज्ञांची समिती नेमून १९५८ साली संघाची नियमावली प्रसिध्द केली व तिला नागपूर विद्यापीठाने मान्यता दिली. यात गोंधळ असा झाला की मराठवाडा विद्यापीठ, पुणे विद्यापीठ येथे महाराष्ट्र साहित्य परिषदेला संमती, नागपूरला विदर्भ साहित्य संघाची नियमावली आणि मुंबई विद्यापीठ जुनीच दादोबा पांडुरंग तर्खडकर नियमावली अनुसरित होते. यात एकसूत्रता आणण्याच्या दृष्टीने तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी सर्व साहित्यसंस्थांना मान्य होईल अशी नवीन नियमावली करुन देण्याविषयी दत्तो वामन पोतदारांना विनंती केली. तेव्हा पोतदारांच्या अध्यक्षतेखाली सर्व साहित्यसंस्थांच्या सहकार्याने समितीने नियमावली तयार केली. या चौदा कलमी नियमावलीला महाराष्ट्र शासनाने १९६२ मध्ये मंजुरी दिली. पुढे १९७२ मध्ये आणखी नवीन चार नियमांची भर घालण्यात आली. या अठरा कलमी नियमांचे राज्यकारभारात व शिक्षणाच्या सर्व क्षेत्रात पालन करण्याचे ठरविले. ही पार्श्वभूमी यासाठी सांगितली की आजच्या मराठीच्या दुरावस्थेची, विशेषत: लेखन शुध्दीची जी कारणे सांगितली जातात त्यांची मुळे उपरोक्त पार्श्वभूमीमध्ये शोधता येईल.

**लेखननियम आणि व्याकरण** :

**Studies in Indian Place Names (UGC Care Journal)**
*ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05*
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

ऐवढे सर्व उपद्व्याप होऊन मराठी लेखनासाठी जे नियम बनविले गेले ते आणि जुने तर्खडकरी नियम यांच्यानुसार लेखनपध्दती आत्मसात करण्यासाठी संस्कृत भाषेचे ज्ञान असणे ही पूर्वअटच होऊन बसले. १९३० नंतर सोपेपणा यावा यासाठी बनविलेल्या नियमांनी तर मराठी लेखन अधिकच अवघड होऊन बसले. प्रारंभी हे नियम सोपे वाटले तरी तत्सम व मराठी शब्दांना वेगवेगळे नियम लागू केल्याने आणि सामान्यरुपे, सामासिक रुपे यांनाही तसेच नियम लावल्याने भल्याभल्यांना अधिकच अनाकलनीय वाटू लागले व मराठी लेखनाला आजची अवकळा प्राप्त झाली. यावर काही उपाय सुचविणारी मंडळीही ऐवढे जालीम उपाय सुचवितात की त्या जालीम औषधापेक्षा रोग परवडला असे वाटावे. श्रीमती सत्वशीला सामंत यांनी सुचविलेले एक दोन उपाय उदाहरणासाठी घेऊ. त्या म्हणतात, "मात्र त्यांची अंमल बजावणी (१९६० पूर्वीचे नियम) करताना वेगळे धोरण अनुसरता येईल. इंग्रजी माध्यमाच्या व मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये 'उच्चस्तर मराठी' व 'निम्नस्तर मराठी' शिकवावे व या स्तरातून चांगल्या प्रकारे उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मराठी अध्यापन क्षेत्रात प्रवेश द्यावा. ज्या विद्यार्थ्यांना पोटापुरते जुजबी मराठी शिकवायचे असेल त्यांना निम्नस्तरीय मराठी शिकवावे. मात्र या स्तरातून आलेल्या विद्यार्थ्यांना मराठीच्या अध्यापन क्षेत्रात प्रवेश देऊ नये." त्यांनी सुचविलेला दुसरा एक उपाय असा, "भविष्यात, आदर्श मानदंड हे कितीही अल्पसंख्य असले तरी बहुसंख्येच्या जोरावर त्यांची प्रतिष्ठा काढून घेऊ नये. कारण आदर्शाची संकल्पना ही मानवी संस्कृतीशी निगडीत असते व संस्कृती सांभाळणाऱ्या व्यक्ती हया नेहमीच अल्पसंख्य असतात."१ या उपायातून सामंताना नेमके काय सुचवायचे आहे? आपल्याच विद्यार्थ्यांना आपलीच भाषा अगम्य ठेवून भाषेवरील प्रभुत्वाची मक्तेदारी स्वत:कडेच ठेवण्याचे राजकारण करणे हे एक प्रकारचे सामंतशाही (सरंजामशाही या अर्थाने, एक प्रकारचा हा जातीयवादही होऊ शकेल) धोरण होणार नाही का? सामंताना अपेक्षीत संस्कृतीरक्षक, आदर्श मानदंड निर्माण करणारे अल्पसंख्य नेमके कोण? बहुजनातील प्रतिभेच्या व कर्तबगारीच्या जोरावर आदर्श ठरणाऱ्या मोजक्या व्यक्ती की स्वयंघोषित संस्कृतीरक्षक म्हणवणारे? सामंत पुढे असेही म्हणतात की, मराठी प्रमाणभाषेच्या शुध्दलेखन पध्दतीतूनच आपणास संस्कृत भाषेची ओळख करुन घेणे व ती टिकवणे क्रमप्राप्त आहे. संस्कृतच क्रमप्राप्त का? ती मराठीची जननीभाषा म्हणून मान्य केली, तरीही संस्कृत प्रसृत पाकृत, अपभ्रंश या कालिकदृष्टया मराठीला जवळच्या. त्यांना वळसा घालून थेट संस्कृतीशी नाते जोडताना या मधल्या भाषेचे काय करायचे? आणि महत्वाचा प्रश्न हा की, मराठीची संस्कृत-निरपेक्ष व्याकरण आणि लेखननियमावली बनविताच येणार नाही का?

माझ्या मते भाषेच्या प्रसारात आणि भाषेच्या गुणवत्तेच्या दर्जात प्रचलित लेखनाच्या नियमाना, ऱ्हस्व, दीर्घांना महत्व नसावे. भाषा संपर्काचे, संदेश पोहचविण्याचे माध्यम आहे. भाषेतल्या ऱ्हस्व, दीर्घत्वाच्या नियमांनी भाषेत क्लिष्टता येत असेल आणि त्यामुळे संपर्काची, संदेशाची गती कमी

**Studies in Indian Place Names (UGC Care Journal)**
*ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05*
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

होत असेल तर शुध्दलेखनाचे हे हटवादी नियम काढूनच टाकायला हवे. त्यामुळे बीन कामाच्या विवादाना उत्तरे द्यावी लागणार नाहीत. शुध्दलेखनातील मक्तेदारी आणि अहंकार संपेल. दैनंदिन व्यवहारात कामाचा वेग वाढवणारी सुगम मराठी भाषा नक्कीच गुणवत्तेचा दर्जा प्राप्त केलेली असेल असे ठामपणे वाटते. नाहीतरी मराठीतील ऱ्हस्व,दीर्घत्व अर्थनिर्णायक नाहीतच, तेव्हा ह्या बांडगुळाचे झेंगट नकोच.

**पारिभाषिक संज्ञा आणि ज्ञानभाषा :**

आपण जेव्हा मराठी ज्ञानभाषा बनली पाहिजे असे म्हणतो तेंव्हा मराठीला ज्ञानभाषा होण्यासाठी काय करणे आवश्यक आहे याविषयी फारसे गांभिर्याने विचार करत नाहीत. स्वातंत्र्योत्तर काळात मराठी शिक्षणाचे माध्यम बनली खरी मात्र एखादी भाषा शिक्षणाचे माध्यम बनल्याने ज्ञानभाषा होत नसते. तरी शिक्षणाचे माध्यम असणे तर जरुरीचे आहेच, सोबत प्राथमिक संकल्पनाही जडणघडण त्याच भाषेतून होणे आवश्यक आहे आणि दैनंदिन व्यवहार, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, प्रशासकीय व्यवहार मराठीतच व्हावयाला हवे होते. मात्र वास्तव तसे दिसत नाही. असे का झाले असावे?

आपली मातृभाषा मराठी असल्याने ती आपली भावनिक, कौटूंबिक पातळीवर तसेच आपल्या परिसराची दैनंदिन व्यवहाराची भाषा आहे. मात्र आपल्या कुटूंबाच्या, परिसराच्या बाहेर पाऊल टाकले तर असे दिसते की, बाजारातील व्यवहाराची भाषा अल्पशी मराठी आणि जास्त प्रमाणात हिंदी, मोठेमोठे उद्योगधंदे, न्यायालयीन व्यवहार, उपजीविकेशी संलग्न व्यवहार हे इंग्रजीमधून महाराष्ट्राच्या शासनव्यवहाराची प्रशासकीय भाषा मराठी आणि इंग्रजी. केंद्रशानाची प्रशासनाची भाषा हिंदी आणि इंग्रजी . मराठी चित्रपट क्षेत्राची पिछेहाट झाल्याने मनोरंजनाचे माध्यमही प्रामुख्याने हिन्दी, असे चित्र महाराष्ट्र दिसत आहे. हिन्दीचा मराठीवरील प्रभाव मराठी आणि हिंन्दी भाषिक यांच्यातील अलिकडच्या काळात झालेला संघर्ष, या संघर्षाला मिळालेले प्रादेशिक, सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय स्वरुप बघता हा विषय नाजुक आणि संवेदनशील आहे याची जाणीव आहे. हिन्दीच्या प्रभावाबद्दल कौतिकराव ठाले पाटील यांचे मत लक्षणीय आहे. ते म्हणतात, "हिन्दीने मराठीवर केलेली ही कुरघोडी हा विसाव्या शतकाच्या उत्तरार्धाचा महाराष्ट्राला व मराठी माणसाला मिळालेला भाषिक व सांस्कृतिक शाप आहे."२ तेव्हा मराठी केवळ शिक्षणाचे माध्यम ठेवल्याने भागणार नाही. मराठीला ज्ञानभाषेचा दर्जा मिळवण्यासाठी उपरोक्त सर्व व्यवहार मराठीतून झाले पाहिजेत, व्हायला हवेत. त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणाची गरज आहे शासन, सामाजिक-सांस्कृतिक-साहित्यिक-शेक्षणिक संस्था आणि वौयक्तिक पातळीवर आपणावरही ही जबाबदारी आहे.

मराठीला ज्ञानभाषा होण्यासाठी पारिभाषिक संज्ञा हाही एक मोठा अडथळाच आहे. पारिभाषिक संज्ञा जाणीवपूर्वक संस्कृत भाषेतून घडविण्याचे प्रयत्न इंग्रजी राजवटीपासूनच सुरु होते. पुढे संस्कृतचे महत्व कमी होत गेले. त्यामुळे वेगवेगळया ज्ञानशाखांमध्ये संस्कृतमधून पारिभाषिक संज्ञा आणण्याची

**Studies in Indian Place Names (UGC Care Journal)**
*ISSN: 2394-3114Vol-40, Special Issue-05*
NAAC sponsored two days National Conference on New Accreditation Process and Quality Enhancement for rural colleges
Held on 4 and 5th February 2020
SunderraoSolankeMahavidyalaya, Majalgaon Dist. Beed, Maharashtra, India. 431 131

प्रक्रिया जवळपास थांबली. पारिभाषिक संज्ञाच्या संदर्भात सुधीर रसाळांचे मत पाहण्यासारखे आहे. ते म्हणतात, "खरे म्हणजे पारिभाषिक संज्ञांसाठी संस्कृतकडे जाण्याची गरज नव्हती. मराठी भाषा ही जर स्वतंत्र भाषा असेल तर तिला संस्कृत शब्दही इंग्रजी शब्दांइतके परके आहेत, असे म्हणायला हवे. यावर व्यवहारीक उपाय म्हणजे इंग्रजी पारिभाषिक संज्ञा स्वीकारुन त्यांचाच वापर मराठी वौज्ञानिक लेखनात करायचा, हा ठरु शकेल."३ रसाळांचा हा तोडगा मान्य करण्यासारखा आहे. तरीही मराठीतील किंवा मराठीच्या बोलीतील शब्द पारिभाषिक संज्ञासाठी घेता येऊ शकतात. बोलींमध्ये तशी विपूल शब्दसंपदा उपलब्ध आहे. या पर्यायाचा तोकडेपणा जाणवू लागल्यानंतरच इंग्रजी पारिभाषिक संज्ञाना मराठी रुपे देऊनच स्वीकारण्याच्या पर्यायाचा विचार व्हावा, असे सूचवावे वाटते.

**इंग्रजी आणि हिन्दीचा प्रभाव** :

आंग्लकालखंडामध्ये ज्ञानभाषा म्हणून इंग्रजी भाषा लादली गेली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजासोबतच इंग्रजीही हाकलली जावी आणि देशी भाषेतून शिक्षण, व्यवहार व्हावेत असे त्यावेळी आपल्याला वाटत होते. परंतु स्वातंत्रोत्तर काळात उलट इंग्रजीचे स्तोम माजले. कारण आपली नौकरशाही ब्रिटीशांच्या तालमीत तयार झालेली होती. अंगवळणी पडलेली प्रशासकीय पध्दत, रुळलेली वाट सोडून देशी भाषेमधून नवी वाट धुंडाळणे परंपरानिष्ठ नोकरशाहीने पध्दतशीरपणे नाकारले. त्यामुळे संसदेत होणारे कायदे, केंद्र आणि राज्ये यांच्यातील पत्रव्यवहार अशी सर्वच व्यवहारे इंग्रजीतून होत राहिली. इंग्रजी मूल्यव्यवस्था, प्रशासकीय रीतिरीवाजाचा वारसा आपण टिकवला पाहिजे या विचारातूनही इंग्रजीचे स्तोम कायम राहिले. उलट इंग्रजीतून व्यवहार करता येणे, बोलता येणे प्रतिष्ठेचे होऊ लागले. याची उलटी प्रतिक्रिया होताना आम्हाला इंग्रजीसमोर समर्थ पर्याय उभा करता आला नाही. इंग्रजी शब्दांना पर्याय देताना मातृभाषेतले, देशीभाषेतले किंवा बोलीतले समर्थ पर्याय उपलब्ध असताना आम्ही संस्कृतचे पर्याय दिले.

वानगीसाठी एक-दाने उदाहरणे देतो. अलिकडे आपल्या प्रत्येकाच्या घरात संडासरुम, बाथरुम असते. त्याचा उच्चारही आपण संडासरुम, बाथरुम असेच करतो. आपल्या बोलीत हागरे, नहाणी असे समर्थ पर्याय उपलब्ध असताना शौचालय, स्थानगृह असे बोजड संस्कृत पर्याय दिल्याने सर्वसामान्यांनी ते नाकारले. बोलतील दुसरे उदाहरण, अलिकडे फारच लोकप्रिय आणि सार्वजनिक ठिकाणीही अभिव्यक्त केल्या जाणाऱ्या 'आय लव्ह यू' या भावनेचे. या भावनेचा मराठीतला पर्याय 'माझं तुझ्यावर प्रेम आहे' हा कृत्रिम वाटतो. त्याचा प्रभावही फारसा परिणामकारक नसावा. परिणामाची साशंकता असल्याने ही भावना इंग्रजीतूनच व्यक्त करण्याकडे कल असतो. मराठी बोलीतील या भावनेचे पर्याय 'माझा जीव जडलाय तुझ्यावर' किंवा 'माझा जीव अडकलाय तुझ्यात' ही किती खोल आणि सुक्ष्मातीसुक्ष्म पदर असलेली समर्थ भावना होती. ती वरील इंग्रजीतून व्यक्त होणाऱ्या भावनेची समर्थ पर्याय होती, परंतु

आम्ही केवळ भाषांतरीत प्रेम व्यक्त करु लागल्याने आपल्याला इंग्रजीचा आधार घ्यावा लागला. तेव्हा इंग्रजीला पर्याय देताना बोलीतील शब्दांचाही विचार व्हावा. नसता बोली आणि प्रमाणभाषा यातील दुवे कमी होत जातील आणि कोकणी प्रमाणे इतर बोलीही वेगळी चूल मांडू शकतील. जेव्हा इंग्रजी शब्दांना समर्थ पर्याय उपलब्धच होणार नाहीत तेव्हा ते शब्द मराठी रुपे देऊन स्वीकारता येतील. नाही तरी परकीय भाषेतील शब्द स्वीकारल्याने आपल्या भाषेला समृध्दताच येत असते. फक्त त्या शब्दांचा वापर कसा केला जातो त्यावर आपल्या भाषेची अवहेलना होतेय की भाषा समृध्द होतेय हे ठरु शकेल. उदा. आपण मोबाईलसाठी भ्रमणध्वनी हा पर्याय दिला, पण तो पर्याय समर्थ नाही हे दिसतेच आहे. आपल्या विरोध 'मोबाईलला' असू नये, परंतु जेंव्हा 'मोबाईल वीक एंडला घेतला' असे भाषा प्रयोग होत असतील तर 'वीक एंड' ला मराठीत रुढ पर्याय असताना हे 'वीक एंड' कशाला? तेंव्हा इंग्रजीतल्या शब्दांना विरोध करण्यापेक्षा अशा थिल्लर भिक्कारचोट प्रयोगाना विरोध करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

१) श्रीमती सत्वशीला सामंत- मराठी लेखनपध्दती, लेख - मराठी संशोधन पत्रिका- आ. नो. डि २००७ - पृष्ठ १३

२) श्री.कौतिकराव ठाले पाटील- एकविसाव्या शतकातील भाषा व समाज, लेख - प्रतिष्ठान जुलै-ऑगस्ट २००० - पृष्ठ १६

३) श्री सुधीर रसाळ- मराठीचे भवितव्य, लेख - प्रतिष्ठान जुलै-ऑगस्ट २००० - पृष्ठ १२

○ **मराठी साहित्यातील नवे विचारप्रवाह**
Marathi Sahityatil Nave Vicharpravah

○ **प्रथमावृत्ती :** ०७ फेब्रुवारी, २०२०

○ **प्रकाशक**
आदित्य प्रकाशन,
खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर-४१३५१२
☎ 02382-257126, Mob. 9405759888

○ **ISBN-978-93-83109-63-0**

○ **मुद्रणस्थळ**
आदित्य ऑफसेट, लातूर.

○ **अक्षर जुळवणी**
श्री. बालाजी बनसोडे

○ **मुखपृष्ठ**
श्री. तानाजी माने, लातूर.

○ **मूल्य :** ३००/-

# अनुक्रमणिका



| अ.क्र | नाव | शीर्षक | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| १. | डॉ.मधुकर क्षीरसागर | मराठवाड्यातील प्रादेशिक कादंबरीची स्वरूप वैशिष्ट्ये | ५ |
| २. | प्रा. डॉ. एम. बी. धोंडगे | साठोत्तरी मराठी दशकातील नवे बदल | १३ |
| ३. | प्रा.डॉ. रामनाथ श्रीपती फुटाणे | मराठी विज्ञानवादी कादंबरीकार : जयंत नारळीकर | १६ |
| ४. | प्रा.डॉ.भाउसाहेब राठोड | लोकभ्रम आणि विज्ञान | २३ |
| ५. | प्रा.डॉ.अनिता काशिनाथ सोनवणे | प्रादेशिक साहित्य : एक अभ्यास | २९ |
| ६. | प्रा. डॉ. दत्तात्रय डुंबरे | स्त्रीवादाची मध्ययुगीन पार्श्वभूमी | ३३ |
| ७. | प्रा.डॉ.भास्कर मुरलीधर आहिरे | उपेक्षितांचे साहित्य | ३९ |
| ८. | प्रा. डॉ. युवराज धबडगे | विस्थापितांच्या उद्ध्वस्त जीवनाचा आलेख – रिगांण | ४४ |
| ९. | डॉ. महादेव जगताप | प्रादेशिक दृष्टिकोनातून 'फेसाटी' चा विचार | ४९ |
| १०. | डॉ.एम.ए.कव्हळे | साठोत्तरी ग्रामीण कादंबरीची वाटचाल | ५४ |
| ११. | प्रा.डॉ.सूर्यकांत हरिश्चंद्र गित्ते | 'फेसाटी' प्रादेशिक कादंबरी : एक आकलन | ५९ |
| १२. | डॉ. एकनाथ श्रीपती फुटाणे | मराठी विज्ञान साहित्य संकल्पना व स्वरुप | ६८ |
| १३. | डॉ.ज्ञानेश्वर को.गवते | ग्रामीण साहित्य प्रवाह एक आकलन | ७८ |
| १४. | प्रा. गौतम गायकवाड | नव्या साहित्य प्रवाहाचे वैचारिक आधिष्ठान | ८६ |
| १५. | प्रा. डॉ. एल.बी. घुमरे | श्री.ना. पेंडसे आणि व्यंकटेश माडगूळकर यांच्या कादंबरीतील प्रादेशिकता | ९२ |
| १६. | शिवचरण प्रभाकर गिरी | विज्ञानवादी मराठी कविता | ९६ |
| १७. | डॉ. अशोक घोळवे | ग्रामीण जिवनाला नव्या जाणिवांसह अविष्कृत करणारी कथा : चऱ्हाट | १०४ |
| १८. | प्रा.रामेश्वर चाटे | उपेक्षिताचे साहित्य | १०८ |
| १९. | डॉ. रामकृष्ण ज्योतिबा प्रधान | एक प्रादेशिक कांदबरी 'बनगरवाडी' | ११३ |
| २०. | डॉ. कोळी अरूण पुंडलिक | मुस्लिम मराठी साहित्य : एकचिंतन | १२० |
| २१. | प्रा. डॉ.रूद्रदेवाड बी.पी. | अनुवादित वाङ्मयाचे उपयोजन : एक आकलन | १२४ |
| २२. | प्रा. अहिरे रविंद्र महारू | साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह आदिवासी साहित्य | १२८ |
| २३. | प्रा.डॉ. राजाभाऊ धायगुडे | श्रीनिवास कुलकर्णी यांच्या ललित निबंधातील प्रादेशिकता | १३२ |
| २४. | प्रा.डॉ.काकासाहेब रामराव सुरवसे | आंबेडकरवादी मराठी कविता | १३८ |
| २५. | ज्ञानेश्वर आश्रुबा भोसले | स्त्रीवादी साहित्य आणि मानवाधिकार'' | १४५ |
| २६. | डॉ.चत्रभुज बालासाहेब कदम | प्रादेशिक आणि सामाजिकतेचा निखारा : कोयता | १४८ |

# लोकभ्रम आणि विज्ञान

**प्रा.डॉ.भाउसाहेब राठोड**
मराठी विभागप्रमुख,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

सर्वच ज्ञात मानवी समुहामध्ये धर्म संकल्पना आहे. आदिम अवस्थेत राहणा–या व्यक्तिला समाजाची, समाजाच्या नीतीनियमांची गरज पडली नसेल परंतु आदिमता जाऊन जेंव्हा समाज अस्तित्वात आला तेंव्हा माणसा माणसातील संबंध सुखावह, सुरक्षित आणि स्नेहमय बनविण्यासाठी सहकार्य, समानता, भातश्भाव, न्याय इत्यादी मूल्याची जोपासना व्हायला लागली. हीच मूल्यव्यवस्था म्हणजे नीती होय. निती धर्माची जननी असते नीती नियमांना जेंव्हा एखादे नामाभिधान मिळते त्यालाच धर्म म्हटले जाते. धर्म संकल्पनेमुळे व्यक्तिंच्या वर्तन व्यवहारावर नियंत्रण ठेवता येते. व्यक्तीचे वर्तन–व्यवहार धर्मानुकूल असेल तर प्रोत्साहन अन प्रतिकूल असेल तर दंड–शिक्षा, या न्यायाने धर्म व्यक्तिवर्तनावर नियंत्रण ठेवत असते. समाजाची स्वत:बद्यलची व स्वत:च्या इतिहासाबद्दलची जाणीव धर्मामुळेच होत असल्याने धर्म एक आदिम मार्ग ठरतो. समाज व्यवस्थेला धर्माची गरज असते. समाजाच्या अभिमानासाठीही धर्म कल्पनेची जरुरी असते. धर्माच्या साधनांद्वारा समाज आपल्या संरचनेचे चित्र रेखाटतो. त्यामुळेच आपल्याला कोणत्याही समाजिक संरचना धर्माद्वारेच कळू शकतात. धर्माला जसे समाजव्यवस्थेचे अंग असते तसे व्यक्तिसंवेदनेचेही एक अंग असते. व्यक्तिसंवेदनेचा हा भाग भ्रांतीनी भरलेला असू षकतो. विशेषत: आदिम जमातीच्या बाबतीत पुष्कळांना वाटते की त्यांचे धर्म केवळ भ्रांतीने भरलेले असतात त्यात वास्तवाचा भाग असतो किंवा असेलच तर तो नाममात्र असतो. परंतु ह्या म्हणतात तथ्य नाही. कोणत्याही बड्या बड्या लोकाशी संबंध असल्याचे सांगत होता. ती पिल्ले त्याने बावन्न हजारात खरेदी करण्याचा सौदा केला. आणखी थोडे मोठे झाल्यावर तो घेऊन जाणार होता. परंतु त्यातील एक पिल्लू कषाने तरी मेले. तो तांत्रिक पुन्हा काही परत आलाच नाही. तेव्हा पारध्याने राहिलेले ते एक पिल्लू सोडून दिल्याचे सांगितले. तंत्रविद्येत घुबडाचे महत्व, बावन्न हजाराचा सौदा, राजकारणातील बड्या लोकांषी तांत्रिकाचे असणारे संबंध, सौदा करुनही त्याचे पुन्हा परत न येणे सारेच अद्‌भूत आहे.

माणसांच्या डोळ्यातील दृक्पटल मुख्यत: शंकू पेशींनी बनलेले असते. शंकू पेशी इंद्रधनुष्यातील सप्तरंगाना संवेदनशील असतात. घुबड, मांजर आदी निषाचर प्राण्यांच्या डोळ्यातील दृक्पटल दंडगोल पेशींचे बनलेले असते. या दंडगोल

पेशी अत्यंत मंद प्रकाशाला देखील संवेदनशील असतात. त्यामुळे त्यांना रात्रीच्या काळोखात दिसू षकते. मानवी डोळ्यांना सात रंगाच्या मर्यादिपलिकडे अतिनील अल्ट्राव्हायलेटद्ध आणि अवरक्त इंफ्रारेडद्ध लहरी दिसू शकत नाही. परंतु थर्मोग्राफ तंत्राच्या साहयाने त्या दिसू शकतात. तसेच घुबडासारख्या निशाचर प्राण्यांना अवरक्त लहरी दिसू शकतात. तांत्रिक अशा पाळलेल्या घुबडामार्फत सामान्य माणसांना शक्य नसलेली माहिती मिळवित असतील असा तर्क करता येतो. त्यामुळे घुबडाला तंत्रविद्येत महत्व असावे.

आपल्याकडे जादूविद्येत, भुतपिशाच्च कल्पनेत, आजार ;विषेशत: मानसिकद्ध अवस्थेत अमावस्या पोर्णिमेला महत्व दिले जाते. काही देवतांचे यात्रा उत्सवही अमावस्या पोर्णिमेला असतात. दुखनक—याला वा—या करण्यासाठी भगत भोपे हीच तिथी सांगतात. अमावस्येला एखादी व्यक्ती मरण पावली तर ती नक्की भूत—हडळ होणार या पध्दतीचे लोकभ्रम आपल्याकडे दिसतात. इंग्रजी भाषेतील लूनसी म्हणजे वेड आणि लुनॅटिक म्हणजे वेडा किंवा सरकलेला हे शब्द लॅटिन भाषेतील लुना म्हणजे चंद्र या शब्दावरुन निर्माण झाले आहेत. म्हणून तिकडे वेड लागण्याचा आणि चंद्राचा काही तरी घनिष्ट संबंध आहे, अषी समजूत पूर्वापार चालत आलेली आहे. ती समजूत इतकी दृढमूल होती की तुरुंगाधिकारी विशेष फर्मान काढून शिपायांना रजा देत नसत. पोर्णिमेपूर्वी दोन दिवस अगोदर सरकलेल्या वेड्यांना पकडून आणुन यथेच्छ बदडून काढले जाई व ते काही गुन्हेगारी चाळे करणार नाहीत याची खबरदारी घेतली जात असे.

अमेरिकन इन्स्टिट्यूट ऑफ क्लायमेटॉलॉजी यांनी प्रकाशित केलेल्या अहवालात पोर्णिमेचा मानवी वर्तणुकीवर होणारा परिणाम यावरील भाष्य मोठे उद्‌बोधक आहे. चोरी, उचलेगिरी, विध्वंसक पध्दतीने गाडी चालविणे, मनुष्यवधाला कारणीभूत होईल इतके नशापान हे गुन्हे इतर कोणत्याही दिवसापेक्षा प्रकर्षाने पोर्णिमेच्या दिवशीच अधिक प्रमाणात घडतात. रात्र ढगाळलेली असली आणि चंद्र दिसत नसला, तरी या गुन्ह्यांमध्ये कित्येक पटींची वाढ होतच राहते. याचाच अर्थ या काळात माणूस उन्मादाकडे झुकलेला असतो.

चंद्राचा पृथ्वीभोवती एक आवर्तन पूर्ण करण्याचा कालावधी आणि स्त्रियांचा मासिक पाळीचा कालावधी साधारणत: २८ दिवसाचा असतो. आणि या दोन्ही घटनेत काहीतरी आंतरिक संबंध आहे. डॉ.स्वान्ते आ—हेनिअस या स्विस संशोधकाने स्त्रियांच्या मासिक पाळीची तारीख, वेळ, कालावधी, रक्तस्त्राव वगैरे बाबीची तपशीलवार नोंद करुन त्याची चंद्राच्या तिथीबरोबर सांगड घालण्याचा यत्न केला तेंव्हा शुक्ल पक्षात अधिकाधिक रक्तस्त्राव होतो तर वद्य पक्षात चंद्राच्या कला क्षीण

होत जाताना त्यामानाने खूपच कमी रक्तस्त्राव होतो असे आढळून आले. डॉ.एडसन अॅन्ड्रयू या शल्यविशारदाने शस्त्रक्रियेतील रक्तस्त्राव आणि चंद्रभ्रमणाचा संबंध जोडून निष्कर्श नोंदवितात की, चेटूक करणा–या मांत्रिकाप्रमाणे अमावस्येजवळचे तथाकथित अशुभ दिवस शस्त्रक्रियांसाठी वापरावेत आणि पोर्णिमेजवळच्या आल्हाददायक रात्री प्रणयाराधनासाठी राखून ठेवाव्यात. या संबंधाने लक्षणीय बाब अशी की लोकसाहित्यामध्ये प्रेमगीतासाठीची पार्श्वभूमी बहुधा पोर्णिमेचीच असते. आणि गीतातील नायिकेच्या धर्मातील भ्रांत कल्पना, लोकभ्रम वास्तवाच्या आधाराने आलेले असतात. ते संकेताच्या, प्रतिकांच्या रुपाने आल्याने भ्रांत ठरतात परंतु त्या पाठीमागे वास्तवाचा आधार असतो.

मानवी मनाला बहुधा जन्मतःच धार्मिकतेची, तत्वज्ञानाची बैठक लाभलेली असते. ज्योतीश, ध्यानधारणा, गुढविद्या, जादूटोना, मानसिक शक्ती इत्यादी बाबीकडे मानवी मन ओढ घेते. विज्ञान अशा बाबीवरील गुढतेचा पडदा बाजुला करुन सत्य दर्शविण्याचा प्रयत्न करते. परंतु अनेक घटना विज्ञानाच्या कसोटीवर सिध्द करता येत नाहीत. ते गुढच राहतात. कालांतराने ही गुढे उकलतीलही आणि त्या पाठीमागील कार्यकारणभव विज्ञानाने समजून येईल. तोपर्यंत ही अवाकलनीच गुढे, लोकभ्रम, भ्रमकल्पना समाजजीवनाला प्रभावीत करत राहतात. अशा काही भ्रांत कल्पना पाठीमागील वैज्ञानिक सत्य समजून घेण्याच्या दृष्टीने काही लोकभ्रम पाहू.

बंजारा समाजाच्या लोककथेत अंधा–यावड ही संकल्पना आहे. लोककथेतील नायक राजपूत्र दोन हत्ती आपल्या बगलेत मारुन समुद्रातून पोहत दूरवरच्या बेटावर चारण्यासाठी नेत असतो. इतकी अफाट शक्ती त्याच्याजवळ असते. या बेटावरचा अंधा–यावडाचा छायेत तो सापडतो आणि सहा महिन्यासाठी आंधळा होतो. सहा महिन्यानंतर या छायेतून तो बाहेर येतो आणि त्याला दिसायला लागते या कथेत त्याची अफाट शक्ती वगैरेच्या अतिशयोक्तीपूर्ण वर्णने असली तरी अंधा–यावड ही केवळ भ्रमकल्पना नाही. नार्वेच्या उत्तरेस स्पिटझबर्जेन बेटांचा समूह आहे. उत्तर ध्रुवाजवळील या प्रदेशात सहा महिने दिवस आणि सहा महिने रात्र असते हे आपल्याला अलीकडे माहित झाले आहे. याचे बंजारा समाजाला ज्ञान असण्याची शक्यता नाही. तरी त्यांच्या कथेत ही अंधा–यावडाची संकल्पना कषी आली ? केवळ कल्पनाविलासने ती आलेली नसावी असा तर्क करता येतो. या समाजाचा देश विदेशासीही व्यापारी संबंध होता. त्यातून त्यांना ही माहिती असावी मात्र कालांतराने हे ज्ञान त्यांना राहिले नसले तरी त्यांनी ते लोककथेतून जतन करुन ठेवले आहे.

घुबड हा पक्षी आपल्याकडे अशुभ समजला जातो. तंत्रविद्येत घुबडाला

अत्यंत महत्व आहे. चेटकीणीकडे घुबडे व मांजरे पाळलेली असतात असा पूर्वापार समज आहे. पारधी जमातीवर संशोधन करताना मला एक असा अद्‌भुत अनुभव आला. कापसी वस्तीवरील पारध्यांना घुबडाची दोन पिल्ले सापडली होती. ती त्यांनी पाळली. थोडी मोठी झाल्यावर एक तांत्रिक ती विकत घेण्यासाठी फियाट गाडीमधून आला त्याला कुठून कशी माहिती मिळाली कुणास ठाऊक ! तो राजकारणातील मुखाला चंद्राची उपमा दिलेली असते.

न्यूरॉलॉजिस्ट डॉ.लिओनाई रॅविटझ यांनी चंद्र आणि मानवी शरीरक्रिया यांचा थेट संबंध शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी मनोरुग्णाचे मस्तक आणि छाती या दोन अवयवांचे विद्युतभार संभाव्य नोंदविले. नोंदीवरुन त्यांच्या लक्षात आले की चंद्राच्या कला वाढताना विद्युतभार संभाव्य वाढत जातो. त्यांचा निष्कर्श असा की, चंद्रामुळे पृथ्वीच्या विद्युत चुंबकीय क्षेत्रात सतत बदल घडत असतो. पोर्णिमेला चंद्राचा प्रभाव खूपच वाढतो. त्यामुळे चुंबकीय क्षेत्रातही मोठा फरक पडतो आणि मनोरुग्ण हे मानसिकदृष्ट्या अधिक संवेदनशील असल्यामुळे त्यांच्या विद्युत संभाव्यामध्ये अधिक मोठा फरक पडत असावा.

चंद्राचे गुरुत्वाकर्षण हा तर सरळ सरळ जाणविणारा प्रभाव आहे. अमावस्या पौर्णिमा संबंधाने जे लोकभ्रम आहे त्यामागील वास्तव हे असे आहे.

आपल्याकडे स्वप्नांना काही विशिष्ट अर्थ देण्याची प्रथा आहे. स्वप्ने ही सांकेतिक असतात. या संकेताना आपण अर्थ देण्याचा प्रयत्न करतो. त्यातील संकेत आणि गुढ उकलण्याचा प्रयत्न करतो. सिग्मंड फ्राईड आणि युंग यांनी मानवी मनावर बरेच संशोधन केले आहे. मानवी मनाच्या अबोध पातळीवरील दाबल्या गेलेल्या भावना, इच्छा, आकांक्षा स्वप्नरुपाने  बाहेर पडतात असे त्यांचे मत आहे. या इच्छा, वासना समाजमान्य नसल्याने त्या प्रतिकरुपाने येतात. त्यामुळे त्या गुढ, अनाकलनीय ठरतात. तो एक प्रकारचा मिथ्याभास असतो. काही सांधु, बैरागी, फकीर, जोगी यांना सिध्दी प्राप्ती झाल्याचे सांगतात. तेही काही चमत्कार, मायाभास तयार करतात. काही नषा आणणा—या वनस्पती, पदार्थ असतात. त्यामुळे देखील असे मायाभास होऊ शकतात. गांजा, चरस, सोम नावाची वनस्पती, मोहफुले इत्यादीच्या सेवनामुळे असे मिथ्याभास होतात. संमोहनावस्थेतील व्यक्तीही अवाक्याबाहेरील अचाट कर्मे करुन दाखविते. अंगात आलेला भगतही काही चमत्कृती दाखवितो. सामान्य माणसांच्या अवाक्याबाहेरच्या या चमत्काराभोवतालच्या बाबीना गुढतेचे वलय लाभते. अनेक ठिकाणी या बाबींना  धार्मिक कृत्यांमध्ये स्थान देण्यात येते. अशा बाबी आपण श्रध्दा आंधश्रध्देच्या प्रांतात नेऊन ठेवतो.

इतर प्राण्यांच्या तुलनेत मानवी मेंदू अत्यंत विकसित आहे. त्यातल्या

मोठ्या मेंदूवर करडया रंगाचा पेषींचा एक थर ;सेरेब्रल कॉर्टेक्सद्ध विकसित होतो. यावर विचारषक्ती अवलंबून असते. झोपेचा आणि या भागाचा बराच संबंध आहे. गाढ झोपेत मेंदूचा हा भाग कार्यशील नसतो. त्यावेळी डोळयाची बुबुळे अचल राहतात. मात्र श्वासोश्वास,हृदयस्पंदने नियमित असतात. चाळवणा—या विरोध ाभासी निद्रेत डोळयाची बुबुळे सतत हलत असतात. विचारशक्ती केंद्र कार्यशील असते मात्र सर्व स्नायू शिथिल पडलेले असतात. याच कालावधीत माणसाला स्वप्ने पडतात. शरीराच्या स्नायूंचे शिथिलीकरण झाल्यामुळे प्रतिक्षिप्त क्रिया देखील घडू शकत नाहीत. भितिदायक, भेसूर स्वप्नात माणूस असहाय बनतो. त्याला हालचाल करता येत नाही की ओरडता येत नाही. काही तज्ज्ञाच्या मते, स्वप्ने आज आलेला अनुभव आणि पूर्वायुष्यातील स्मृतीमध्ये असलेला अनुभव यांची सांगड घालतात आणि नविन स्मृती सेरेब्रल कॉर्टेक्सच्या स्मृतिकोषात साठविण्यास मदत करतात. स्वप्नात दिसणा—या सांकेतिक चिन्हांचा संबंध अंतर्मनाशी, अबोध मनाशी असतो हे अंतर्मन किंवा अबोध मत अत्यंत गुंतागुंतीची आपल्याला स्वत:लाही जाणीव नसलेली मेंदूची कार्यप्रणाली आहे.

आजच्या विज्ञानाच्या सर्वमान्य माहितीप्रमाणे ज्ञान, बुध्दिमत्ता, विचारशक्ती, समज, शहाणपण या महत्वाच्या बाबी मोठया मेंदूच्या अखत्यारीत आहेत तर शरीराचा तोल राखणे, सामंजस्य या दोनच बाबी लहान मेंदूकडे आहेत. याचाच अर्थ मोठा मेंदू अत्यंत महत्वाचा, अधिक कार्यप्रवण तर लहाण मेंदू दुय्यम आहे. मात्र आश्चर्याची बाब अशी की योगसाधना, कुंडलिनी जागृती, प्राणायाम वगैरे साधना करणारी मंडळी मात्र लहान मेंदूच्या खालील भागात कल्पिलेले आज्ञाचक्र महत्वाचे मानतात. हे आजच्या शास्त्रीय ज्ञानाच्या अगदी उलट मत आहे. ही योगसाधना करणारी साधु, जोगी वगैरे मंडळी आज्ञाचक्र जागृती म्हणजेच अबोधमनात प्रवेश करतात असा याचा अर्थ घ्यावा लागेल. यालाच समाधीची अवस्था म्हणता येईल. सामान्य स्थितीत आपल्या अवतीभोवती हजारो घटना घडत असतात. परंतु आपली चेतासंस्था त्यांना चाळणी लावून आवश्यक तेवढेच संदेश घेते. मात्र अबोध मनात प्रवेश करणा—यांसाठी अगदी मोजकेच संदेश त्यांच्यामार्फत येतात. त्यामुळे एखादी मायक्रोफिल्म एन्लार्ज करुन पाहावी तसा प्रकार घडतो. म्हणजे हा मायाभास अंशत: वस्तुस्थितीचा क्लोजअप खूप मोठा करुन पाहण्यासारखा प्रकार आहे.

या अबोध मनाच्या दालनांत प्रवेश करण्यासाठी काही व्यक्ती प्रयत्न करतात. काही धर्मांच्या, पंथाच्या पारंपरिक आचारसंहितेत लयबध्द हालचाल करणे, विशिष्ट लयीत, स्वरात प्रार्थना म्हणणे, मंत्रोच्चरण, स्वत:भोवती गरगर फिरणे वगैरे अनेक आचार पध्दतीनी स्वत:ला समाधी अवस्थेकडे नेण्याचा प्रयत्न असतो.

दीर्घकाळ विशिष्ट पध्दतीने श्वसन नियंत्रण करणे, उपवास करणे, एकांतवासात राहून न झोपता शरीराची रासायनिक गुणवत्ता बदलणे, कडक उन्हात उभे राहून तहान न भागविता भ्रमिष्टावस्थेत जाण्याचा प्रयत्न केला जातो. अशा अवस्थेत विविध रंगाचे ध्वनी ऐकू येडू लागतात. संगीताचा गंध येडू लागातो, दृष्य प्रतिमाना चव येडू लागते. अशा अनुभूती घेणा—या व्यक्ती सामान्यांच्या दृटीने वेडी, सरकलेली असू शकतात. मात्र या विक्षिप्त वाटणा—या व्यक्ती अबोधमनाच्या पातळीवरील प्रचंडपणे दाबल्या गेलेल्या प्रेरणाआवगाने सामान्यांच्या आवक्याबाहेरील कार्य करतात. यालाच आपण चमत्कार साक्षात्कार वगैरे म्हणतो.

जे शास्त्रीय कसोटयात टिकत नाही, ज्याचे स्पष्टीकरण देता येत नाही ते सर्व गुढ, अनाकलनीय अशी संभावना केली जाते. मात्र या लोकभ्रमाच्या पाठीमागे काही वैज्ञानिक वास्तव असण्याची शक्यता गृहीत धरायला हवी. कुठेतरी गुढविद्यावाद्यांच्या आणि विज्ञानवादी संशोधकांच्या चिंतनाच्या दिशा समांतर व्हायला हव्यात असे निश्चित वाटते.

## संदर्भ

१. डॉ.सुरेशचंद्र नाडकर्णी — अज्ञाताचे विज्ञान— मेहता पब्लिशिंग हाउस, पुणे
२. डॉ.भाउूसाहेब राठोड— पारधी लोकसंस्कृती— गोदा प्रकाशन, औरंगाबाद
३. डॉ.भाउूसाहेब राठोड यांचा मराठवाडयातील बंजारी लोकगीते व दंतकथा यांचा सामाजिक व वाडमयदष्टया चिकित्सक अभ्यास हा अप्रकशित प्रबंध